शिवाजी महाराजांचा पुतळा पुढील पिढ्यांना स्फूर्तिदायक : फडणवीस

राजकोट येथे छत्रपतींच्या पुतळ्याचे अनावरण

सिंधुदुर्ग । वृत्तसंस्था

छत्रपती शिवाजी महाराज महान योद्धा होते. त्यांचे विचार सर्वांसाठी प्रेरणादायी आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाने विक्रमी वेळेत शिवरायांच्या कर्तृत्वास साजेसा भव्य पुतळा उभारला असून महाराजांचा हा पुतळा पुढील पिढ्यांना स्फूर्तिदायक ठरणार असल्याचे, प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मालवण येथील राजकोट किल्ल्यावर उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री नितेश राणे, सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रसिंह भोसले, खासदार नारायण राणे, आमदार सर्वश्री दीपक केसरकर, रवींद्र चव्हाण, नीलेश राणे, निरंजन डावखरे, जिल्हाधिकारी अनिल पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. माणिक दिवे, प्रभारी पोलीस अधीक्षक हृषिकेश रावले, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता किणी आदी उपस्थित होते.

सार्वजनिक बांधकाम विभागाने विक्रमी वेळेत पुतळ्याचे काम पूर्ण करुन महाराजांच्या कर्तृत्वास साजेसा भव्य पुतळा उभारला आहे.

मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वच यंत्रणांनी अतिशय वेगाने काम केले आहे. ज्येष्ठ मूर्तीकार राम सुतारांनी कमी वेळेत आकर्षक आणि देखणा पुतळा साकारला आहे. आयआयटी, जे. जे. स्कूल ऑफ आर्टस्चेही पुतळा उभारणीत मोलाचे योगदान लाभले आहे. मी सर्वांचे अभिनंदन करतो. पुतळा उभारताना कोकणातील वेगवान वारे व वादळांचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. याची उंची पाहता महाराजांचा हा देशातील बहुदा सर्वात उंच पुतळा ठरेल. पुतळ्याची भव्यता लक्षात घेता पुतळ्याच्या आसपासचा परिसर विकसित करुन पर्यटनाला चालना देण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. कोकणच्या विकासाला नेहमीच प्राधान्य दिलेले आहे. पर्यटनाच्या दृष्टीने कोकणचा अधिकाधिक विकास करणार आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही मनोगत व्यक्त केले. शिवप्रभूंच्या पदस्पर्शाने पावन झालेली ही भूमी आहे. या भूमीत छत्रपती शिवाजी महाराजांचा हा भव्य पुतळा अभिमान, स्वाभिमान आणि शौर्याचे प्रतीक आहे. हा पुतळा येथे येणाऱ्या पर्यटक आणि शिवभक्तांसाठी एक आदराचे स्मारक ठरेल, असा विश्वास शिंदे यांनी व्यक्त केला.

प्रारंभी मुख्यमंत्री व मान्यवरांच्या हस्ते शिवआरती करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतीकात्मक मूर्तीचे पूजन करण्यात आले. यावेळी आकर्षक रंगांत फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. ज्येष्ठ मूर्तीकार अनिल सुतार, बांधकाम विभागाचे अधिकारी यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

३१.७५ कोटी खर्च

सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत ३१ कोटी ७५ लाख रकमेतून हा पुतळा उभारण्यात आला आहे. ज्येष्ठ मूर्तीकार राम सुतार यांच्या कंपनीमार्फत हे काम पूर्ण करण्यात आले आहे. पुतळा उभारण्याचे काम ईपीसी तत्त्वावर झालेले आहे. तलवारधारी पुतळ्याची उंची ६० फूट असून संपूर्ण पुतळा ब्रॉंझ धातूमध्ये उभारण्यात आला आहे. पुतळ्याच्या आधारासाठी स्टेनलेस स्टील सपोर्ट फ्रेमवर्क करण्यात आले आहे. चौथऱ्यासाठी उच्च दर्जाचे कॉंक्रिट व स्टेनलेस स्टील सळईचा वापर करण्यात आला आहे. पुतळ्याचे संकल्पन आयआयटी मुंबईकडून तपासून घेण्यात आले आहे.

'ऑपरेशन सिंदूर' सुरूच

भारतीय वायूसेनेची स्पष्टोक्ती; पाकिस्तानला इशारा

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

'ऑपरेशन सिंदूर' अद्याप संपलेले नाही. ते अजूनही सुरू आहे, असे भारतीय वायूसेनेकडून आज स्पष्ट करण्यात आले. भारताच्या आक्रमक कारवाईने घाबरलेल्या पाकिस्तानने अमेरिकेच्या मध्यस्थीनंतर तातडीने भारतासोबत युद्धविरामाचा करार केला. त्यानंतर आज भारतीय वायूसेनेने 'ऑपरेशन सिंदूर' अद्याप संपलेले नाही, असे सूचित करून पाकिस्तानला इशाराच दिला आहे.

वायूसेनेने आपल्या अधिकृत 'एक्स' समाज माध्यमावर 'ऑपरेशन सिंदूर'बाबत स्पष्टीकरण देऊन एक प्रकारे पाकिस्तानचा गैरसमज दूर करण्याचाच प्रयत्न केल्याचे दिसून येत आहे. भारतीय वायुसेनेने 'ऑपरेशन सिंदूर'चे लक्ष्य यशस्वीपणे पूर्ण केले आहे. देशहितासाठी ही मोहीम आक्रमकपणे राबवण्यात आली. अर्थात ही मोहीम अजूनही सुरूच आहे. ती थांबण्यात आलेली नाही. याबाबत अधिक माहिती नंतर देण्यात येईल. कोणत्याही अफवा आणि

अधिकृत नसलेल्या माहितीवर विश्वास न ठेवू नये, असे आवाहनही वायूसेनेने केले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानी व त्यांच्याच अध्यक्षतेखाली आज उच्चस्तरीय समितीची बैठक झाली. बैठकीस केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल, परराष्ट्रमंत्री एस जयशंकर, संरक्षण प्रमुख जनरल अनिल चौहान, भारतीय लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी, भारतीय हवाई दलप्रमुख अमर प्रीत सिंह आणि भारतीय नौदलप्रमुख ॲडमिरल दिनेश के. त्रिपाठी उपस्थित होते. या बैठकीनंतर 'ऑपरेशन सिंदूर'बाबत भारतीय वायूसेनेने समाज माध्यमावर माहिती दिली आहे.

भाजप कामगार मोर्चाचे कार्यक्रम

नवीन नाशिक । प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टी कामगार मोर्चा, नाशिक जिल्हा यांच्यातर्फे बुद्ध पौर्णिमा व संविधान गौरव अभियान या दोन विचारप्रवृत्त संकल्पनांचा संगम साधणारा विशेष कार्यक्रम आज सोमवारी (दि. १२) सायंकाळी ५ वाजता आर. के. लॉस, पाथर्डी फाटा येथे आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती कार्यक्रमाचे आयोजक कामगार मोर्चा जिल्हाध्यक्ष राहुल आरोटे यांनी दिली.

या कार्यक्रमात भगवान गौतम बुद्ध यांच्या जीवनदृष्टीचा व भारतीय संविधानाच्या मूल्यांचा प्रचार करणारे प्रेरणादायी व्याख्यान आयोजित करण्यात आले असून, मुख्य वक्ते म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ गोपीनाथराव मुंडे ग्रामीण विकास व संशोधन संस्थेचे माजी संचालक डॉ. रमेश पांडव मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजप प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी तर प्रमुख पाहुणे म्हणून आमदार सीमा हिरे, भाजप शहराध्यक्ष प्रशांत जाधव, ग्रामीण जिल्हाध्यक्ष सुनील बच्छाव, निमा अध्यक्ष आशिष नहार, कामगार मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष डॉ. तुषार जगताप, उत्तर महाराष्ट्र सरचिटणीस व्यंकटेश मोरे उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाचे आयोजन कामगार मोर्चा जिल्हाध्यक्ष राहुल आरोटे व शहराध्यक्ष हेमंत नेहेते यांनी केले असून, कार्यक्रमाच्या माध्यमातून कामगार वर्गात सामाजिक समरसता, संविधानिक मूल्यांची जाणीव आणि भगवान बुद्धांच्या विचारांचे महत्त्व प्रभावीपणे पोहोचवले जाणार आहे.

मानवसेवा वृद्धाश्रमात काव्यसंमेलन

इंदिरानगर । वार्ताहर

मानवसेवा वृद्धाश्रमाच्या प्रांगणात मदर्स डेच्या पूर्वसंध्येला 'कवितेच्या संवेदना... माणुसकीच्या वाटा' या काव्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले.

काव्य संमेलनाचे प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पत्रकार अभय सुपेकर, अबुधाबी दुबई येथील आंतरराष्ट्रीय कवी मनोज शंकर भारशंकर, वर्तमानपत्रातील सचिन बेडीस, शेख ईसाक सामाजिक कार्यकर्ते प्रसाद ढाकरगे विद्रोही कवी, प्रबोधनकार व वक्ते विनोद नाठे ,कवि प्रणव सोनार, अभिजीत कांडेकर मानवसेवा वृद्धाश्रमाच्या संचालिका ललिता नवसागर उपस्थित होते.

हजारो शब्दातून जे सांगता येत नाही ते कवी आपल्या शब्दातून

चार-पाच ओळीत मांडत असतो, असे सांगतानाच वयोवृद्धांना उतरत्या वयाच्या सांजवेळी आधाराची गरज भासते. एकाकीपणामुळे त्यांची मानसिकता ढासळते आणि त्यांना भावनिक आधाराची नितांत गरज असल्याचे ज्येष्ठ पत्रकार अभय सुपेकर यांनी मदर्स डेच्या शुभेच्छा दिल्या. प्रसाद ढाकरगे यांनी समाजातील सद्यस्थितीवर चिंता व्यक्त केली. यावेळी वयोवृद्धांना फळे वाटप करण्यात येऊन दोन दिवसाच्या भोजनदानाचा खर्च मनोज भारशंकर यांनी केला. कार्यक्रमाचे आयोजन प्रियदर्शी सम्राट अशोका वेल्फेअर फाउंडेशनचे संस्थापक टी. एल. नवसागर यांनी केले होते. यावेळी काव्य संमेलनाचा एकमेव उद्देश शब्दांच्या माध्यमातून माणुसकीचे भान जपणे असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

कवींचा शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आले. रमेश मसुरकर यांनी सूत्रसंचालन व निवेदन केले. तर तेजस नवसागर,रुपेश नवसागर, योगेश दंडाळे यांनी काव्य संमेलनाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले आले.

विद्योत्तमा संस्थेचा वृद्धाश्रमात मदर्स डे

नाशिकरोड । प्रतिनिधी

साहित्य, सामाजिक क्षेत्रातील विद्योत्तमा फाउंडेशन या संस्थेने मानवसेवा वृद्धाश्रमात वृद्धांसमवेत मदर्स डे साजरा केला.

संस्थेचे अध्यक्ष सुबोध मिश्रा, राजेश पुराणिक, पौर्णिमा घिल्लन आदींची प्रमुख उपस्थिती होती. भजन,विविध चित्रपट गीतांचा कार्यक्रम झाला. संस्थेतर्फे दुपारी भोजन सेवा देण्यात आली. आवश्यक वस्तू, औषधे संस्थेचे सर्व सभासद व पदाधिकारी यांच्या उपस्थितीत मानवसेवा केअर सेंटरच्या संस्थापक नवसागर यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष सुबोध मिश्रा यांनी केले.

बुद्ध पौर्णिमेनिमित्त खीरदान, स्नेहभोजन

देवळाली कॅम्प । विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने बुद्ध पौर्णिमा (वैशाखी पौर्णिमा) निमित्ताने ज्ञान मंदिर (बौद्ध विहार) येथे आज सोमवारी साय. ६ वा. भव्य मंगल मैत्री रॅली खीरदान व स्नेहभोजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. योगेश श्रावण गजरे यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे. तरी या कार्यक्रमास नागरिकांनी उपस्थित राहून स्नेहभोजनाचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन जयंती अध्यक्ष नीलेश साळवे यांनी केले आहे.

बुद्धपौर्णिमेनिमित्त कार्यक्रम

नाशिक । बुद्धपौर्णिमा आज साजरी होणार आहे. बुद्ध पौर्णिमेला बौध्द भिक्षू गावगावातील बुद्ध विहारात एकत्र येऊन परीत्रान पाठ, सूत्र पठण करणार आहे. बुद्ध मूर्तीसमोर मेणबत्ती दीप लावून पूजन केले जाणार आहे. शहरातील बुद्ध विहारांमध्ये व परिसर विविध पताकांनी सजवला गेला आहे. नाशिकमध्ये त्रिरश्मी बौद्ध लेणी येथे दिवसभर विविध कार्यक्रमासह खीरदान होणार आहे. वैशाख पौर्णिमेला दानाचे विशेष महत्त्व सांगण्यात आले आहे. गरजूंना अन्न, पैसे, कपडे, छत्री, बूट आणि चप्पल दान केले जाते.

मेडीनोव्हा हॉस्पिटलमध्ये यशस्वी रोबोटिक गुडघेरोपण

नाशिक । भारतातील सर्वात प्रगत रोबोट्स्या मदतीने गुडघेरोपण शस्त्रक्रीया ही डॉक्टरचे कौशल्य आणि तंत्रज्ञानाची अचूकता याचा संगम असून यामुळे नाशिकच्या मेडीनोव्हा शताब्दी हॉस्पिटलमध्ये अल्पावधीतच हजारो गुडघेरोपण शस्त्रक्रिया यशस्वी झाल्याचे नामवंत सांधेरोपणतज्ज्ञ डॉ. कपिल कापडणीस यांनी सांगितले.मेडीनोव्हा शताब्दी हॉस्पिटलमध्ये जगातील प्रगतजॉन्सन ॲण्ड जॉन्सन वेलस रोबोटिक असिस्टेड सोल्युशन ही एक अत्याधुनिक प्रणाली कार्यान्वित आहे. ही प्रणाली

सर्जनला अचूक शस्त्रक्रियेसाठी मदत करते. आजपावेतो सुमारे १.५ दशलक्ष हून अधिक रुग्णांवा या तंत्रज्ञानाने मदत झाल्याचे डॉ. कापडणीस म्हणाले. गुडघेदुखीमुळे शारीरिक हालचाल कमी होऊन स्थूलता ,मधुमेह ,हृदयरोग अशा विविध आजारांनी रुग्ण ग्रस्त होऊ शकतात. हालचाल कमी झाल्यामुळे समाजामध्ये मिसळणे,फिरणे कमी होते. त्यामुळे रुग्णात एकलकोंडेपणाही वाढतो. यामुळे दुखणे अंगावर न काढता तज्ज्ञांचा सल्ला घेऊन शस्त्रक्रिया करून घेणे उचित राहते असेही ते म्हणाले.

आजचे कार्यक्रम

वसंत व्याख्यानमाला

* स्व. निर्मलाताई दातार स्मृती व्याख्यान

वक्ते : डॉ. मेधा ताडपत्रीकर, आंतरराष्ट्रीय पर्यावरण तज्ज्ञ, पुणे

विषय : प्लास्टिक : वरदान आणि धोका

* मेलडियस कराओके क्लब व उदय पाटील प्रस्तुत – ९०

पद्मतारा संस्थेचे मातृदिनी शिबिर

नाशिकरोड । येथील श्री पद्मतारा सामाजिक शैक्षणिक व बहुउद्देशीय संस्था आणि वाघ श्री क्लासेस यांच्यातर्फे मातृदिनानिमित्ताने मोफत नेत्रतपासणी शिबिर झाले. १३२ रुग्णांनी लाभ घेतला.

डॉ. योगेश सिंघानिया, बाळासाहेब भंडारी, ॲक्टिव्ह सोशल संस्थेचे अध्यक्ष प्रमोद साखरे, संस्थेचे अध्यक्ष अविनाश वाघ, सचिव प्रशांत मलठणकर, सरिता पाचपांडे यांची प्रमुख उपस्थिती होती. सरिता पाचपांडे यांनी आईची महती, संस्कारक्षम जीवन तसेच नेत्रविकार व उपचार पद्धती यावर मार्गदर्शन केले. तुलसी आय हॉस्पिटलचे कमळ ढिल्लोर यांनी रुग्णांना मार्गदर्शन केले. संयोजन अभिषेक शहाणे, स्पंदन चौधरी, श्रद्धा मालुंजकर, आदिती निकम, आदेश वाघ, विश्वजीत शहाणे, राहुल शिंदे, आकाश निमसे, महेश डोकफोडे, धीरज बर्जे, चंद्रकांत लोंढे, राजू तनपुरे, रॉबर्ट गॅब्रियल, प्रकाश राहणे, अशोक जगताप आदींनी प्रशांत मलठणकर यांनी आभार मानले.

ज्येष्ठांकडून सत्कार म्हणजे कौतुकाची थाप : बिरमाणी

देवळाली कॅम्प । ज्येष्ठ नागरिक संघटनेच्या हस्ते आजच्या विद्यार्थ्यांचा सत्कार होणे म्हणजे विद्यार्थीच्या पाठीवर शाबासकीची थाप असल्याचे प्रतिपादन उद्योजक महाराज बिरमाणी यांनी केले.

येथील देवळाली रोटरी ज्येष्ठ नागरिक संघटनेच्या वतीने दहावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सत्कार सोहळ्याप्रसंगी बिरमाणी बोलत होते. यावेळी फेसकॉमचे प्रादेशिक सचिव श्रीराम कातकडे, संघटनेच्या अध्यक्षा कौसल्या मुळाणे, खंडेराव गायकवाड, नारायण आडके, देवराम मुठाळ, केशव पाळदे, सुनीता आडके, राजेंद्र जाधव, अंबादास पाटील आदींसह मान्यवर उपस्थित होते. यावेळी बिरमाणी यांनी ज्येष्ठ नागरिक संघटनेस सर्वतोपरी मदत करणार असल्याचे सांगितले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते ४० विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास निर्मला वाघुळकर, उज्ज्वला देशमुख, नंदा भुतडा, रमण कहार, सुरेखा पेठारे, माया नुनसे, आशा रनशेवरे, जनाबाई जाधव, किसन पेठारे आदी उपस्थित होते.

पोलीस पाल्यांसाठी समर कॅम्प

योगा, झुंबा, एरोबिक्सचे प्रशिक्षण; शनिवारी ट्रेकिंग

नाशिक । प्रतिनिधी

बंदोबस्त आणि कामाचा अतिरिक्त ताण यामुळे पोलीस अधिकारी – अंमलदारांना कुटुंबीयांकडे लक्ष देता येत नाही. परंतु, पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या संकल्पनेतून याहीवर्षी 'समर व्हेकेशनल कॅम्प'चे आयोजन करण्यात आले. त्यात पोलीस पाल्यांनी धूम केली. एवढेच नव्हे तर पोलिसांचा संसाराचा गाडा आपल्या खांद्यावर पेलणाऱ्या त्यांच्या घरातील महिलांनी योगा आणि झुंबात सहभागी होत आनंद लुटला.

१६ एप्रिलपासून पोलीस पाल्यांसाठीच्या समर कॅम्पला प्रारंभ झाला असून, १ जूनपर्यंत हा कॅम्प असेल. आयुक्तालयातील ३ ते १५ वर्षांतील १५० मुले-मुलींनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. तर, ८० महिला झुंबा, योगा, एरोबिक्सच्या प्रशिक्षणास सहभाग घेतला आहे. सोमवार ते शुक्रवार या दरम्यान सकाळी ६ ते ९ या वेळेत कॅम्प सुरू आहे. मुलांच्या सकाळ सत्रामध्ये धावणे, स्ट्रेचिंग केले जाते. त्यानंतर, फुटबॉल, व्हॉलीबॉल, बास्केट बॉल, थ्रोबॉल यासह मैदानी खेळांचे प्रशिक्षण दिले जाते. तर सायंकाळी पाच ते साडेसहा या वेळेत बॉक्सिंग, तायक्वांदो, उशू, ज्युडो, कराटे या खेळांचे प्रशिक्षण दिले जाते. यासाठी प्रशिक्षक व उपनिरीक्षक अश्पाक शेख, विजय काठे, प्रणय रुद्रवंशी, मंगेश जगझाप, बाळासाहेब भोर, मंगेश जाधव, योगेश पगारे, संतोष उशिर, अश्विनी भोसले, सोनाली काटे, रुचा हिरे याशिवाय खासगी प्रशिक्षक अनिल भोसले, प्रेम गुरुंग, कार्लोस थॉमस, हिरा बुलाखे, जान्हवी विसपुते, करण सिंग, भावना पाटील हे प्रशिक्षण देत आहेत.

महिलांसाठी ट्रेकिंग

पोलीस आयुक्तालयाच्या मैदानावर या समर कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार ते शुक्रवारी क्रीडा प्रकारांचे प्रशिक्षण तर, दर शनिवारी पोलीस पाल्यांना ट्रेकिंगवर नेण्यात येते. पांडवलेणी, चामरलेणी, अंजनेरी टेकडी, रामशेज किल्ला, खंडेराव टेकडी याठिकाणी पोलीस पाल्यांसह महिलांनी ट्रेकिंगचे नियोजन आहे.

पान १ वरुन..

उद्दिष्टानुसार अंमलबजावणी अपेक्षित

करणे अशा घटना अधूनमधून घडतात. ज्यांचे सावट मुलांच्या भविष्यावर पडते. प्रत्येकाच्या बाबतीत अशा घटना विवेकशीलतेने हाताळल्या जाण्याची शक्यता कमीच. त्यामुळे योग्य वयात योगशास्त्राचे संस्कार केले गेले तर मुलांमध्ये सुजाणता रुजण्यास मदतच होऊ शकेल. तथापि त्यासाठी हा निर्णय उद्दिष्टानुसार अमलात आणला जाणे अपेक्षित आहे. शाळांमध्ये क्रीडा तास वेळापत्रकात बंधनकारक असतात. शासकीय नियमानुसार वेळापत्रकात त्यांचा समावेश देखील आढळतो. पण किती शाळांमध्ये ते तास फक्त खेळांसाठी वापरले जात असू शकतील? मुलांना मैदानी खेळ खेळायला लावले जात असतील? अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी ते तास उपयोगात आणले जातांना आढळतात. मैदानी कवायतीऐवजी वर्गातच उपक्रम घेतले जातांना आढळतात. याला काही शाळा अपवाद असू शकतील. तशी संभावना योगप्रशिक्षणाची होणार नाही अशी अपेक्षा करावी का?

दहशतवाद निर्मूलन हेच उद्दिष्ट

पायाभूत सुविधा नष्ट करणे या स्पष्ट लष्करी उद्दिष्टासह 'ऑपरेशन सिंदूर'ची संकल्पना मांडण्यात आली. भारतीय लष्कराने दहशतवादी हल्ल्याला चोख प्रत्युत्तर दिले. दहशतवाद्यांच्या अड्ड्यांवर अचूकपणे लक्ष्य करण्यात आले. ७ मेस पहाटे लष्कराने ९ दहशतवादी अड्ड्यांवर कारवाई सुरू केली. या कारवाईत १०० हून अधिक दहशतवादी मारले गेले. त्यात दहशतवादी युसूफ अझहरचा समावेश आहे. पाकिस्तानी लष्कराचे उच्च अधिकारीही मारले गेले आहेत, असे घई यांनी सांगितले

संसदेचे विशेष अधिवेशन बोलवा

ताज्या घडामोडी लक्षात घेता, संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याची सर्व विरोधी पक्षांची एकमताने विनंती केली आहे. युद्धविरामाची घोषणा प्रथम वॉशिंग्टन डीसी आणि नंतर भारत व पाकिस्तान सरकारकडून करण्यात आली याचाही उल्लेख खर्गे यांनी पत्रात केला आहे.